# समाज उद्धारक महाराजा सयाजीराव गायकवाड

**डॉ. एस. बी. फड,** विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग, नेताजी सुभाषचंद्र कॉलेज, नांदेड.

**प्रा. उदयकुमार नारायण लाड,** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी—कोतोली ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे स्वातंत्र्यपूर्व काळातील बडोदे संस्थानाचे संस्थानिक होते. नर्मदा व मही नद्यांच्या दरम्यान बडोदे संस्थानाची व्याप्ती होती. महाराजा सयाजीराव गायकवाड हे १८७५ ते १९३९ या काळात बडोद्याचे राजा होते. या ६४ वर्षाच्या दीर्घकालावधीमध्ये त्यांनी बडोदे संस्थानात विषमता निर्मूलनाचे उल्लेखनीय कार्य केले. बडोद्यामध्ये सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक इत्यादी बाबतीत विषमता पसरलेली होती. सयाजीराव महाराजांनी त्यांच्या प्रजेमध्ये समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अनेक योजना राबविल्या. त्यांच्या कार्याबद्दल इतिहासाचार्य वि. का. राजवाडे म्हणतात की, ''भारतातील शंभर वर्षातील कर्तृत्ववान व्यक्तीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा उल्लेख पहिल्यांदा करावा लागेल.'' (आपटे दा. ना., (१९३६): ५०)

स्वातंत्र्यपूर्व काळात चौसष्ट वर्ष राज्य करणारे महाराजा सयाजीराव गायकवाड हे एक विचारवंत राजा आहेत. ते बारा वर्षापर्यंत निरक्षर होते. राजमुकुट माथी आल्यानंतर त्यांना अंक आणि अक्षर ओळख झाली. ते मेहनती होते. जिद्दीनं ते मराठी, गुजराती, इंग्रजी भाषा, इतिहास, राज्यप्रशासन आणि रीतिरिवाज शिकले. शिक्षणानं ज्ञानाचा तिसरा डोळा उघडला गेला. शिक्षण हे प्रगती आणि परिवर्तनाची गुरुकिल्ली आहे, हे या तरुण राजानं राजकारभार हाती घेताच ओळखलं. जे उत्तम शिक्षण आपल्याला मिळाले ते प्रजेला द्यायचं हा त्यांनी निर्णय घेतला.

१८८१ ला महाराजा सयाजीराव यांनी राजाने प्रत्यक्ष राज्यकारभार हाती घेताच गाडी—घोडयावर बसून राज्याचा सगळा भूभाग जवळून बघितला. रयतेच्या भेटीगाठी घेतल्या. या राजाने बघितले, बहुतांश रयत गरीब आणि अडाणी होती. अस्पृश्य आणि आदिवासींची स्थिती तर आणखी वाईट होती. सोनगडच्या जंगलात आदिवासींची संख्या मोठी होती. घोडयावर बसून सयाजीराव आदिवासी प्रजेला भेटायला आले. पाडयावरची ही माणसे भिऊन झाडावर, झुडुपाआड लपून बसली. आतापर्यंत कोणताही राजा या जंगलात प्रजेला भेटायला आला नव्हता. सयाजीरावांनी जंगलातील आदिवासी प्रजेची चौकशी केली. राजाला घाबरून त्याकाळी प्रजा पुढे येत नाही हे त्यांना सांगण्यात आले. या भागात अस्पृश्य लोकांची बरीच वस्ती होती. त्यांची ही दूरवस्था त्यांनी बघितली. बडोद्याच्या एकूण लोकसंख्येच्या दहा—अकरा टक्के आदिवासी—अस्पृश्यांची वस्ती होती. ते सर्व खूप मागासलेले होते. दारिद्रय आणि शिक्षणाच्या अभावामुळे ही सारी प्रजा दु:खद रानटी जीवन जगत होती. त्यांना बघून, या तरुण राजाला खूप वाईट वाटले. बडोद्यास परतताना सयाजीरावांनी मनाशी निर्णय घेतला. या अस्पृश्य, आदिवासींना अगोदर शिकविले पाहिजे आणि अस्पृश्य आणि आदिवासींच्या शिक्षणासंबंधी पहिला हुकूम काढला. सरकारी खर्चाने या मुलांसाठी शाळा—वसतिगृहे सुरू केली. वंचित समाजाच्या परिवर्तनासाठी शिक्षण देणारा हा हिंदुस्थानातील नव्हे तर जगातील पहिला समाजक्रांतिकारी हुकूम होता. यावेळी सयाजीराव होते केवळ एकोणीस वर्षांचे! एवढेच नाही तर यानंतर दहा वर्षांतच १८९२ साली महाराजा सयाजीरावांनी बडोद्यात सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले. हाही हिंदुस्थानातील पहिला निर्णय होता. या दोन्ही घटना म्हणजे शिक्षणाने समाज परिवर्तन करणाऱ्या समाज क्रांतिकारी बदलाची नांदी ठरल्या.

महाराजा सयाजीरावांनी चौसष्ट वर्षे राज्य केले. एवढे दीर्घकाळ राज्यकारभार करत जनकल्याणाचा ध्यास घेतलेले उदाहरण जगभरात दुर्मीळच आहे. ढोबळमानाने त्यांच्या कालखंडातील चार महत्वाचे टप्पे दिसून येतात.

१. अनुभव काळ (१८८१ ते १८८७): सयाजीराव १८७५ साली राजगादीवर आले. १८८१ पर्यंत सहा वर्षे स्वत:चे शिक्षण आणि राज्यप्रशासनाचे शिक्षण झाले. ही सहा वर्षे परिवर्तनाची होती. अठराव्या वर्षी १८८१ ला प्रत्यक्ष राज्यकारभार त्यांच्या हाती आला. १८८१ ते १८८७ हया अनुभव काळात राज्यपध्दती समजून घेणे, त्यात योग्य ते बदल करणे आणि या बदलांची समर्थपणे अंमलबजावणी करताना विविध प्रकारच्या अनुभवांना त्यांना सामोरे जावे लागले.

२. अभ्यास काळ (१८८७ ते १८९५): पहिल्या राणी चिमणाबाई यांच्या अकाली मृत्यूमुळे सयाजीराव यांना निद्रानाशाचा आजार जडला. हिंदुस्थानातील उपचारासोबत परदेश पर्यटन व उपचारासाठी १८८७ ला विलायतेचा पहिला प्रवास घडला. यातून जगातील चांगल्या गोष्टी जिज्ञासूपणे न्याहाळल्या त्याचा अभ्यास केला. यांचा उपयोग बडोद्यासाठी कसा करता येईल, हयाचा विचार करुन जगभरातील चांगल्या तज्ञांना बडोद्यात आणणे सुरु केले.

३. विचार काळ (१८९५ ते १९०९): अभ्यासातून, अनुभवातून, पाहण्यातून जमविलेल्या नवकल्पना, जगभरातील नानाविध विचार, प्रशासन पध्दती, साहित्य, कला—संस्कृतीचा सयाजीरावांनी डोळसपणे स्वत: अभ्यास केला. मनापासून या गोष्टींना प्रोत्साहन देण्याची योजना आखू लागले. या सर्व बाबींचा उपयोग आपल्या प्रजेसाठी आणि उत्तम प्रशासनासाठी करण्याचा शंभर टक्के प्रयत्न स्वप्न पूर्ण केले.

४. प्रगती काळ (१९०९ ते १९३५): सयाजीराव यांचे अनुभव, अभ्यास, प्रत्येक गोष्टींकडे दूरदृष्टीपणे पाहून यशस्वी अंमलबजावणी केल्यामुळे हिंदुस्थानातील सर्वक्षेत्रातील वेगळेपण उठून दिसू लागले. महाराजांच्या स्वप्नांच्या आविष्कार म्हणजे बडोदा राज्याची झालेली प्रगती होय. हा प्रगतीकाळ स्थैर्याचा आणि सर्वव्यापी सुधारणांचा काळ होता. (भांड बाबा, खंड १२, (२०१७): १६)

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक उद्धाराचे तत्व**

सयाजीराव गादीवर येऊन दोनच वर्ष झाले होते. १८७७ साली दिल्लीला एका समारंभासाठी त्यांना जावे लागले. दुपारचे भोजन अहमदाबादला रेल्वेच्या अतिथी गृहात होते. त्याकाळात शाकाहारी आणि मासांहारी वेगवेगळया पंगती बसायच्या. राज्यभिषेकानंतर दोन वर्षाचे शालेय शिक्षण झालेल्या राजाने आपल्या गुरुजनास या पंगतीभेदाबद्दल विचारले. कवळाणा खेडे गावात असा भेदाभेद त्यांनी अनुभवला नव्हता. या किशोरवयीन राजाने निर्णय घेतला. दोन्ही प्रकारच्या मंडळींना एका टेबलावर जेवायला बोलावून स्वत: पंगतीभेद दूर केला. सयाजीराव स्वत: मागासवर्गीयांच्या शेजारी भोजनास बसले. पंगतीभेद दूर केला, हया सामाजिक सुधारणेची सुरुवात स्वत: राजवाडातून केली. (भांड बाबा, आधुनिक भारताचे शिल्पकार, (२०१९): ७,९)

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्यता निर्मूलनाविषयक योगदान महत्त्वपूर्ण आहे. राजा या नात्याने बडोदे संस्थानाचा राज्यकारभार करताना अस्पृश्यता उद्धाराचे कार्य केले. उदारमतवादी दृष्टीकोण हा त्यांचा स्वभावधर्म होता. व्यक्तीस्वातंत्र्याचे ते पुरस्कर्ते होते. १८७५ पूर्वी बडोदे संस्थानात जात, धर्म, वंश, वर्ग अशा भेदामुळे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांच्या अधिकारावर बंधने येत होती. अस्पृश्य वर्ग मागास, गरीब, अडाणी होता. त्यांना मानवी हक्कांची जाणीव नव्हती. समाजातील सर्व घटकांची प्रगती झाल्याशिवाय राज्याची प्रगती होत नसते. म्हणून अस्पृश्य व मागास समजल्या जाणाऱ्या लोकांचे महाराजांनी प्रबोधन केले. त्यांच्या मौखिक लोकसाहित्याचे जतन केले. मोफत शिक्षण, वसतिगृहे, आरोग्य, राजकीय सहभाग, सामाजिक समता याविषयी कायदे केले. त्यांच्या पारंपरिक व्यवसायांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देवून अस्पृश्यांना स्वावलंबी बनविले. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'सयाजीराव महाराजांइतके अस्पृश्य जातींसाठी दुसऱ्या कुणीही काम केले नाही'

हिंदुस्थानात अस्पृश्योद्धार झाला नाही, तर हिंदू धर्माचे फार मोठे नुकसान होणार आहे. वेदकाळात अस्पृश्यता नव्हती (दादूमिया, (२०१०): ४९). प्राचीन वर्णव्यवस्था लोप होवून जातीव्यवस्था उदयास आली. प्रत्येकजण आपली जात सांभाळू लागला. त्यामुळे समाजव्यवस्थेचे नुकसान झाले आहे. अस्पृश्यांना आधुनिक शिक्षण देवून स्पृश्यांच्या बरोबरीला आणण्याचे वचन महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी स्वामी दयानंद सरस्वती यांना दिले होते. (दादूमिया, (२०१०): ६८).

महाराजा सयाजीराव गायकवाड सत्तेवर येण्यापूर्वी बडोदे संस्थानात अस्पृश्यता पाळली जायची. समाजातील एक असा वर्ग होता की, इतर उच्चवर्णीय समजले जाणारे लोक अस्पृश्यांना स्पर्श करणे पाप समजत होते. त्यामुळे अस्पृश्य समजला जाणारा वर्ग मागास राहिला होता, त्यांना कोणत्याच प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. ते लोक अडाणी, गरीब व निष्क्रीय होते. त्यांना उच्चवर्णीय लोक कोणत्याच गोष्टीत सहभागी करून घेत नव्हते. अस्पृश्य लोक शिक्षणापासून वंचित होते. त्यामुळे त्यांना त्यांच्या हक्काची, स्वातंत्र्याची समतेची जाणीव नव्हती. अस्पृश्यता किंवा चातुर्वर्ण्य व्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे, अशी लोकांची समजूत होती. महाराजांनी अशा खोट्या समजुतींवर आधारलेल्या विषमतेमुळे समाजाचे व राज्याचे कसे नुकसान होते हे समाजाला पटवून दिले (भांड बाबा, (२०१३): ६७).

१९२१ साली 'द प्रिन्स ऑफ वेल्स' बडोदे संस्थानाच्या दौऱ्यावर आले. तेव्हा त्यांच्या स्वागताच्या कार्यक्रमात महाराज म्हणाले होते की, ''हिंदुस्थानात मोठा जनसमूदाय अस्पृश्य समजला जातो. हिंदुस्थानची आजची प्रगती खरी प्रगती नाही. कारण इथल्या अस्पृश्य बांधवांना समता आणि बंधुता ही मानवी मूल्ये नाकारली आहेत. महात्मा गांधी व त्यांचे अनुयायी या सामाजिक प्रश्नासाठी फार मोठे काम करत आहेत. महात्मा गांधींचा सल्ला व मार्गदर्शन यांचे अनुकरण करणे गरजेचे आहे. नाहीतर पश्चातापास सामोरे जावे लागेल.'' (पवार निंबाजीराव, (१९८८): १५२).

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी हिंदू, ख्रिस्ती धर्म, इस्लाम धर्म, बौद्ध धर्म अशा विविध धर्मांच्या तत्त्वांचा अभ्यास केला होता. त्यामुळे अस्पृश्यता निर्माण होणे किंवा अस्पृश्यांना कमी दर्जाचे स्थान देणे हा फक्त एक लोकभ्रम असल्याचे ठाम मत व्यक्त केले व त्या मतानुसार अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य हाती घेतले. अस्पृश्यांपेक्षा उच्च मानल्या गेलेल्या जातींच्या प्रतिनिधींनी महाराज सयाजीराव गायकवाड यांना विरोध केला. या अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यावर टीका केली. अस्पृश्यांसाठी राबवण्यात आलेल्या योजनांमध्ये सहकार्य न करता अशा योजना काढणे म्हणजे धर्मशास्त्राच्या विरूद्ध असल्याचे मत मांडले. महाराजा सयाजीराव यांनी कोणतीच योजना जबरदस्तीने लादली नाही. जबरदस्ती करून किंवा हुकूम जनतेवर लादून त्या योजनांची अंमलबजावणी योग्यप्रकारे होईलच असे नसते. महाराजांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासाठी जे कायदे, योजना किंवा हुकूम काढले ते कालबाह्य झाल्यावर त्यात कालानुरूप बदल केले (दादूमिया, (२०१०): १०९).

डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या विद्यार्थ्यांना महाराज सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्तीची मदत केली. म्हणून अस्पृश्य जातीत जन्माला येऊनही त्यांना स्वतःच्या कर्तृत्वाने उच्च पद प्राप्त करता आले. डॉ. आंबेडकरांच्या रूपाने अस्पृश्यांना प्रतिनिधी मिळाला. पुढे स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार होताना आंबेडकरांनी मोलाचे योगदान दिले. अस्पृश्यांना त्यांची सामाजिक, शैक्षणिक स्थिती सुधारण्याची व उच्चवर्गीय लोकांच्या बरोबरीने मूलभूत अधिकार प्राप्त करण्याची संधी मिळाली. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य अस्पृश्यांना दिशादर्शक ठरले. जे लोक अस्पृश्य म्हणून स्पर्शबाह्य ठरवले होते. तेच लोक शिकून, ज्ञान मिळवून उच्च समजल्या जाणाऱ्या जातींच्या लोकांबरोबर सामाजिक जीवन जगू लागले. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींबरोबर उच्चवर्णीय लोक समानतेने व बंधुभावाने वागण्यास सुरूवात झाली (गायकवाड फत्तेसिंहराव, (१९८९): २७०).

डॉ. आंबेडकर मुंबईमध्ये राजमहालात महाराज सयाजीराव गायकवाड यांना भेटायला गेले. त्यांना दरबारात महाराजांनी बोलावले. पण डॉ. आंबेडकर दारातच उभे होते. आपण अस्पृश्य असल्याने महालात जाण्याचा अधिकार नाही असा समज त्यांच्या मनात होता. मॅट्रिक संपल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी बडोदे संस्थानाच्या शिष्यवृत्तीच्या मदतीने पुढे शिक्षण घेतले व शिक्षणाची उच्च पातळी प्राप्त केली. त्यांना जातिभेदाच्या दुष्परिणामाची जाणीव झाली. व त्यांनी अस्पृश्य बांधवांसाठी मोलाचे कार्य केले. विठ्ठल रामजी शिंदे यांनीही बडोदे संस्थानात अस्पृश्य निर्मूलनाविषयी कार्य केले. या त्यांच्या कार्याची व्याप्ती बडोदे संस्थानापूर्ती मर्यादित न राहता ती हिंदुस्थानात पसरली. अस्पृश्य समाजाचे प्रबोधन करण्याच्या महत्त्वाच्या कार्यास सयाजीराव महाराजांनी हातभार लावला (गायकवाड फत्तेसिंहराव, (१९८९): १०७).

**महाराजा सयाजीरावाकडून सामाजिक उद्धाराच्या कार्याची अंमलबजावणी**

शिक्षणामुळे मानवाच्या सर्व शक्तींचा विकास होतो. राजवाड्यातच नव्हे तर तळागाळातल्या जनतेपर्यंत, शिक्षण पोहोचवून त्यांना बहुजनांच्या बरोबरीने अधिकार देणे हे राजाचे कर्तव्य असते. जातीभेद किंवा वंशभेद नष्ट करून सर्वांना एकजात सुशिक्षित केल्यावरच समाजाची प्रगती होते. अस्पृश्य लोकांना शाळा, ग्रंथालये उपलब्ध करून देणे व त्याची वाढ करणे हे राजाचे काम असते. बहुजन समाजाने ही आपल्या इतर बांधवांशी समानतेची वर्तणूक ठेवली पाहिजे, समानतेचा विशाल दृष्टीकोण शिक्षणाने प्राप्त होतो अशी महाराजांची भूमिका होती. (पवार निंबाजीराव, (१९८८): ५८).

महाराजांनी बडोदे संस्थानाच्या कायद्यात काळानुरूप बदल केले होते. ब्राह्मण ज्ञानार्जन करत, क्षत्रिय संरक्षण करत, वैश्य व्यापार करत तर शूद्र स्वच्छतेची व हलकी कामे करत होते. सर्व वर्गाची कार्ये ठरलेली होती. बुद्धिसामर्थ्य व शरीरसामर्थ्य, व्यवहारचातुर्य व सेवा यांची गरज विशिष्ट एका जातीसाठी नसून ती सर्वांना असते. जातीवाचक गुणांपेक्षा कर्तव्यबुद्धीवर विश्वास ठेवणे महत्त्वाचे असते. सर्व जातीच्या कल्याणातच राष्ट्राचे कल्याण असते. प्रत्येक व्यक्तीने स्वतःची प्रगती केल्यास कुटुंबाची, समाजाची व पर्यायाने राष्ट्राची प्रगती होते. अज्ञानाच्या ठिकाणी मत्सराचे अस्तित्व असते. कुटुंबाकुटुंबात, जातीजातींमध्ये विषमता असली तर राष्ट्राची अधोगती होते. राष्ट्राची उन्नती हे साध्य

असते तर जातीची व समाजाची उन्नती हे साधन असते. उदारमतवादी दृष्टीकोणामुळे स्वार्थत्याग व समानता निर्माण होते.

महाराजा सयाजीराव गायकवाड १९३३ साली अमेरिकेत भरलेल्या दुसऱ्या विश्वधर्म परिषदेचे उद्घाटक होते. जातीद्वेषात लोकशाही नष्ट करण्याची शक्ती असते. वर्णव्यवस्थेमुळे हिंदुस्थानची अवनती झाली. फक्त श्रमविभागणीच्या हेतूने निर्माण झालेल्या वर्णव्यवस्थेने अस्पृश्यतेचे अनेक प्रकार निर्माण केले. उच्च वर्गाच्या पुढाकाराने अस्पृश्यतेवर मात करता येते. सर्व वर्ण हे विराट पुरूषाच्या देहापासून निर्माण झाले असून परस्परांच्या उपयोगी पडणे हे त्यांचे कर्तव्य असते. समाज हा एखाद्या सेंद्रिय प्राण्यासारखा असतो. त्याचे सर्व अवयव सारखेच महत्त्वाचे असतात. परंतु अनेक कृत्रिम कारणांनी जातीभेद ताठर झाला. समाजनिर्मितीचा मूळ अर्थ बाजूला राहिला. पण प्रत्येक व्यक्तीला सर्वोच्च दर्जा प्राप्त करून घेण्यास कोणत्याही रुढीची, परंपरेची अडचण येऊ नये याची दक्षता महाराजांनी घेतली.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी खालील कायदे व हुकूम काढले (भांड बाबा, (२०१३): ४६).

१) सर्व जातींसाठी खुली असणारी संस्कृत पाठशाला स्थापन करण्याचा हुकूम काढला.
२) संस्कृत शाळेतील व इतर शाळेतील अस्पृश्य व गरीब विद्यार्थ्यांसाठी पाच पाच रुपयांच्या दहा शिष्यवृत्या देण्याबाबतचा कायदा केला.
३) दरवर्षी १५ जानेवारीला बडोदे शहरात व्याख्यानमाला ठेवली जात होती. अस्पृश्य जातीतील थोर व्यक्तींच्या चरित्रांवर व्याख्याने देण्याचा कोणत्याही जातीच्या लोकांना हक्क देणारा हुकूम काढला.
४) अस्पृश्य अथवा कोणत्याही जातीला एखाद्या नवीन कायद्याची आवश्यकता भासली व तो कायदा समाजोपयोगी असेल तर तो समाज राजाकडे तशी शिफारस करू शकतो असा कायदा केला.
५) कोणतीही योजना प्रथम मागास व वंचित लोकांपासून राबवण्यास सुरूवात करण्याविषयक कायदा केला.
६) सरकारी खर्चाने अस्पृश्यांना शाळा, वसतिगृहे, मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा कायदा केला व हा कायदा न पाळणाऱ्यास दंड बसविला.
७) अस्पृश्यांना मोफत आरोग्य सुविधा व उद्योगधंद्यासाठी कर्जे देण्याविषयक कायदे केले.
८) कायदेमंडळावर अस्पृश्य प्रतिनिधी नेमण्याचा हुकूम काढला.

१९१८ साली डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक परिषद मुंबईचे महाराज सयाजीराव गायकवाड अध्यक्ष होते (दादूमिया, (२०१०): ७०). अस्पृश्यता हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. बडोद्यात जातिभेद निर्मूलनविषयक अनेक कार्यक्रम राबविले गेले. हिंदुस्थानात अस्पृश्यतेचा प्रश्न जटिल होता. कायदे करून हा प्रश्न सुटण्याची शक्यता कमी होती. त्यामुळे लोकांची विचारसरणी बदलण्यासाठी लोकजागृती करण्यावर महाराजांनी भर दिला. समाजातील घटकांचा वर्ण कर्माने न ठरविता जन्माने ठरविणे म्हणजे शास्त्राचा अनर्थ करणे होय. चार भिन्न जाती म्हणजेच श्रमविभाग असा लोकांचा गैरसमज होता. श्रम विभागणीसाठी जात निर्माण झाली होती. जातीसाठी श्रमविभाग निर्माण झाला नव्हता. पण लोक खोट्या समजुतींनाच कर्तव्य मानत होते. जात ही अत्यंत जुनी संस्था आहे व दूषित रितींनी ती समाजाच्या एकात्मतेस अपायकारक झाली होती. जात या संस्थेतला समाजोपयोगी अर्थ बाजूला जाऊन ती समाज विघातक झाली होती. ती तशीच कायम ठेवणे सयाजीराव गायकवाड महाराजांना योग्य वाटले नाही. जातीभेद एकदम नष्ट होत नसतो. पण त्यासाठी सातत्याने प्रयत्न होणे महत्त्वाचे असते. महाराजांनी सर्व जातींमध्ये दळणवळण व रोटी व्यवहार व पोटजातींमध्ये बेटीव्यवहार घडवून आणले. जातीभेद देवाने निर्माण केला नाही तर तो मनुष्याने निर्माण केला. शास्त्राला भेद मान्य नाहीत तर ते देवालाही मान्य नसतात.

जातीसंस्था निसर्गाच्या व अर्थशास्त्राच्या विरूद्ध असतात. सर्वांना समान संधी हाच सामान्य न्याय असतो. जातीभेदावर मात करण्यासाठी संघटन व सहकार यांची गरज असते. जातीची शूद्रवृत्ती कमी झाल्याने समाजात सांघीकवृत्ती निर्माण होते. धर्माच्या भीतीपोटी जातीभेद पाळण्यात तथ्य नसते. दलित लोक ख्रिस्ती व मुसलमान समाजात वावरत होते. पण हिंदू समाजात वावरण्यास बंदी होती. दलित वर्गाबद्दल महाराजांना सहानुभूती होती. दलितांना अमानुष वागणूक दिली जात होती. महाराजांचा अस्पृश्यता निर्मूलनाविषयी कार्य करणाऱ्या आर्य समाजसंस्थेला पाठिंबा होता. 'डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कार्यासही महाराज सयाजीराव गायकवाड यांनी मोलाचे सहकार्य केले.' मनुष्याला चांगली स्थिती प्राप्त होणे हे त्याच्या नशीबावर किंवा देवयोगावर अवलंबून नसून त्याच्या पुरूषार्थावर

अवलंबून असते. मानवाचे प्रयत्न जितके मोठे तेवढे त्याला उच्च पद प्राप्त होते. या गौतम बुद्धांची शिकवणूक आचरणात आणली पाहिजे

महाराजा सयाजीराव गायकवाड परदेशी शिक्षणासाठी अस्पृश्य जातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देत होते. अस्पृश्य समाजातील मुलांनी शिक्षण घेऊन स्वजातीच्या प्रबोधनाचे व विकासाचे काम करावे असे महाराजांचे उद्दिष्ट होते. १९०७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅट्रिक पास झाले. पुढील शिक्षण घेण्यासाठी त्यांना दरमहा पन्नास रुपयांची शिष्यवृत्ती सुरू केली. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाचा उपयोग जात बांधवांसाठी करण्याचे मान्य केले होते. १९१३ साली त्यांनी बी.ए. पूर्ण केले. पाच वर्षे शिष्यवृत्तीचा लाभ घेतला. अस्पृश्य मुलांसाठी महाराजांनी शाळा सुरू केल्या होत्या. उच्च वर्णीय स्कुल इन्स्पेक्टर त्या शाळा तपासण्यास तयार नव्हते. म्हणून ते काम आर्यसमाजाचे कार्यकर्ते पंडित आत्माराम यांच्यावर सोपविले गेले

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मिलिटरी डिपार्टमेंटमध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून महिना ७५ रुपयांवर नेमणूक केली गेली. धारासभा हे बडोदा राज्यातील कायदेमंडळ होते. सयाजीराव गायकवाड महाराजांनी धारासभेत अस्पृश्य प्रतिनिधी नेमण्याचा हुकूम काढला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तेथे नेमणूक केली गेली. डॉ. आंबेडकरांना अर्थमंत्रीपदी नेमण्याचा सल्ला महाराजांनी मंत्रिमंडळाला दिला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नेमणूक मिलिटरी सेक्रेटरी म्हणून झाली. ते प्रत्येक खात्याची माहिती शिकत होते. कनिष्ठ पदावर असणाऱ्या हिंदू लोकांनी त्यांचा वरिष्ठ अधिकारी म्हणून स्वीकार करण्यास विरोध दर्शविला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा हुकूम पाळला जात नव्हता. फायली लांबून टेबलवर फेकल्या जायच्या. स्पर्शबाह्य मानले जायचे. डॉ. आंबेडकरांना खूप मानसिक त्रास सहन करावा लागला. पण सयाजीराव महाराजांनी डॉ. आंबेडकरांना बंधुभावाने सहकार्य केले (दांडेकर वि. पां., (१९५३): १२५).

मनुष्य म्हणून अस्पृश्यांना जे स्थान मिळाले पाहिजे ते मिळण्यासाठी महाराजांनी त्यांना सर्व सवलती दिल्या. अस्पृश्यांसाठी छात्रालये स्थापन केली. विश्वविद्यालयात मिळणारे उच्च शिक्षण घेण्याकरीता छात्रवृत्त्या ठेवल्या. मानवधर्माची त्यांना स्थापना करायची होती. शहरी–खेड्यातले गरीब, कोष्टी, तांबट, घिसाडी, लोहार, सुतार, कुंभार यांना त्यांच्या उद्योगधंद्यासाठी आर्थिक मदत व तांत्रिक शिक्षण दिले. दलित वर्गासाठी मेहनत करण्यास व दलित शाळांवर शिकवण्यास हिंदू लोक तयार नव्हते, तेव्हा महाराजांनी ख्रिस्ती व मुसलमान लोकांची मदत घेतली. दलित हा शब्द वापरलेला महाराजांना अमान्य होता (खैरमोडे चांगदेव, (१९५२) : ७६). बडोदे राज्यातील सर्व दवाखाने, कोर्ट कचेऱ्या, ग्रंथालये अस्पृश्यांसाठी खुली केली. हिंदुस्थानात अस्पृश्यांनी 'मंदिर प्रवेशाची चळवळ' सुरू करण्यापूर्वी महाराजांनी आपले 'खंडेरावांचे मंदिर' अस्पृश्यांसाठी खुले केले. ''सर्व हिंदू धर्मियांनी जात–गोत मनात न आणता सगळ्यांना देवळांतून प्रवेश करू द्यावा. जे विरोध करतील त्यांचे प्रबोधन करावे. परमेश्वर सर्वांवर सारखेच प्रेम करतो.'' असा हुकूम महाराजांनी काढला (पवार निंबाजीराव, (१९८८): १५०).

महाराजा सयाजीराव गायकवाड अस्पृश्यांसंबंधी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहात होते. गरज असेल तेथे देणग्या देत होते. श्री दमाजीराव गायकवाड शिष्यवृत्ती फंडाच्या व्याजातून अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची सोय केली होती. डॉ. आंबेडकर यांना उच्चशिक्षणासाठी मदत केली. पण बडोदे शहरात त्यांना राहण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यश आले नाही. म्हणून त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. डॉ. आंबेडकरांना मूकनायक या वृत्तपत्रासाठी आर्थिक सहाय्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या प्रगतीसाठी कार्य सुरू केले ही समाधान वाटले. या अस्पृश्यता निवारणासंबंधीच्या परिषदेत संयोजकांनी अस्पृश्यता निर्मूलनासंबंधी ठरावांचा जाहीरनामा तयार केला (आपटे दाजी, (१९३६): ३५५). मागासलेपणाच्या नावावर अनाठायी होणाऱ्या खर्चात कपात केली. १८८३ साली अस्पृश्योद्धाराचा कायदा करून त्यांना सामाजिक न्याय मिळवून दिला. प्रत्येक हुकूम किंवा कायदा पाळण्याची सुरूवात त्यांनी स्वत:पासून केली. (खैरमोडे चांगदेव, (१९६८): ११७). सयाजीराव महाराजांनी अस्पृश्यांना कायद्याने शिक्षण दिले व कायद्याने अस्पृश्यताही दूर केली.

विठ्ठल रामजी शिंदे यांची डिप्रेस्ड क्लासेस मिशन ही संस्था अस्पृश्यांसाठी जे कार्य करत होती त्या कार्याला महाराज सयाजीराव गायकवाड आर्थिक सहाय्य करत होते. शिंदे यांच्या कामाचे महाराजा सयाजीराव गायकवाड जाहीर कौतुक करत असत. शिंदेंच्या कार्याबद्दल महाराज सयाजीरावांना सहानुभूती होती. बडोदे संस्थानात अस्पृश्यांसाठी ३३५ शाळा सुरू केल्या होत्या. ८२ हजार मुले व मुली त्या शाळांमध्ये शिक्षण घेत होते. व या सर्व विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची सोय

केली होती. १९०४ साली मुंबई येथे 'राष्ट्रीय सामाजिक परिषद' भरली होती. महाराजा सयाजीराव गायकवाड या परिषदेचे अध्यक्ष होते. प्रार्थना समाज शिक्षण प्रसाराचे कार्य करत होता. त्यासाठी रात्रीची शाळा चालवली जात होती. या शाळेतील विद्यार्थ्यांना महाराज सयाजीराव बक्षिसे देत असत. अस्पृश्य मुलांच्या शिक्षणामध्ये रात्रीच्या शाळांचे महत्त्वाचे योगदान आहे. या शाळांमधील अनेक विद्यार्थी पुढे अस्पृश्य निवारणाच्या चळवळीचे कार्यकर्ते बनले (घाटे विठ्ठल, (१९६१): २७८).

अस्पृश्य समाजातील स्त्रियांना समाजात वावरण्याची किंवा शिक्षण घेण्याची संधी मिळत नव्हती. त्यामुळे त्यांना स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, स्त्रियांचे हक्क अशा गोष्टींचे महत्त्व कळत नव्हते. बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती. लहानपणीच स्त्रियांना मातृत्व स्वीकारावे लागे. त्यामुळे आरोग्यासंबंधी समस्या निर्माण होत असत. महाराज सयाजीराव गायकवाड महाराजांनी सक्तीचा कायदा केल्यामुळे मुलींची शाळेत उपस्थिती सुरू झाली. शिक्षणप्रसार झाला. त्यामुळे या स्त्रियांना आरोग्याचे महत्व कळू लागले. स्वच्छता राखली जाऊ लागली. अस्पृश्यांची निरोगी व सदृढ पिढी निर्माण होऊ लागली. १८७५ पूर्वी कोणत्याही सार्वजनिक कार्यास उपस्थित राहण्याचा अस्पृश्य जातीतील लोकांना हक्क नव्हता. अस्पृश्य समाजाचे प्रबोधन झाले नव्हते. सयाजीराव महाराजांनी अस्पृश्यांना सर्व जातींबरोबर सार्वजनिक कार्यक्रमात भाग घेण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. इतर समाजाबरोबर अस्पृश्य समाजाचे रोटी व्यवहार, बेटीव्यवहार होऊ लागले. मानवतेचा प्रसार होण्यास मदत झाली. जातीजातींमध्ये भेद मानले जायचे. उच्चवर्णीय लोक अस्पृश्यांना स्पर्श करत नव्हते. विचारांची देवाण घेवाण होत नव्हती. या भेदाभेद असणाऱ्या जातींमध्ये शिक्षण प्रसारामुळे रोटीव्यवहार, बेटीव्यवहार होऊ लागले. समाजात एकता व समानता निर्माण होण्यास मदत झाली (गायकवाड फत्तेसिंहराव, (१९८९): ११०).

भारतात सर्वप्रथम अस्पृश्यांच्या शिक्षणासंबंधी कायदा बडोदे संस्थानात झाला. अस्पृश्य लोक इतके मागास होते की, त्यांच्यासाठी जे महाराजांनी कायदे केले होते, त्यांचा प्रगत राष्ट्रांत विचार करण्याचीही गरज नव्हती (दादूमिया, (२०१०): ६७) अस्पृश्य समाजातील शिक्षणप्रसाराचे सर्वाधिक श्रेय सयाजीराव गायकवाड यांना जाते. ते खऱ्या अर्थाने 'अस्पृश्योध्दारक' होते. संपूर्ण भारतवर्षात या समाजाच्या उध्दारासाठी प्रयत्न करणाऱ्यात महाराजांचा तिसरा क्रमांक लगतो. १८८२—८३ पासूनच त्यांनी या बाबतीत सक्रियपणे काम करायला प्रारंभ केला होता. आपल्या राज्यातील एकही हरिजन अशिक्षित आणि अडाणी असू नये अशी त्यांची इच्छा होती.

अस्पृश्यांच्या उध्दारासाठी बडोद्यात हे फार मोठे कार्य केले गेले आहे. या वर्गासाठी धर्मोपदेशकांची नियुक्ती करणे, ग्रामपंचायतीमध्ये हरिजन सभासद नियुक्तीचे आदेश देणे आणि सरकारी देवळात या वर्गातील लोकांना प्रवेश करण्याची सोय करणे इत्यादी अनेक कामे या वर्गाच्या उत्थानासाठी महाराजांनी आपल्या कारकीर्दीत केली. जातिव्यवस्था आणि उच्च—नीच भेदभाव त्यांनी कधीच मानले नाहीत. आपल्या एका भाषणात त्यांनी म्हटलेच होते, 'विश्वकर्त्या ईश्वराने जाती निर्माण केल्या नाहीत. ईश्वराकडे असा कोणताही भेदभाव नसतो. प्रत्येक माणसाची योग्यता त्याचे उच्च—नीच असणे त्याच्या सद्‌गुणांवर आणि त्याच्या कार्यावर अवलंबून असते.' म्हणजेच केवळ एखाद्या विशिष्ट जातीत जन्म घेतल्यानेच उच्चपणा प्राप्त होतो असे वाटणे किंवा असे म्हणणे न्यायाला धरून नाही. (भांड बाबा, खंड १२, (२०१७): ४८८)

अस्पृश्यतेचा सिध्दांत आपल्या देशासाठी व्यक्ती आणि समाज म्हणूनही हानीकारक आहे. कारण आपल्या एकूण लोकसंख्येच्या एका मोठया गटाला आपण या सिध्दांतामुळे व्यवस्थेबाहेर ठेवतो. ही बाब व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या विकासाला मारक आहे. ही त्यांची दृष्टी एकूणच जातिव्यवस्थेबाबत आपण कालसुसंगत भूमिका घेण्याची गरज व्यक्त करते. ही भूमिका घेत असताना आपल्याला भारताचे पुनर्निर्माण करावयाचे आहे असे ते म्हणतात. म्हणजेच एक राष्ट्र म्हणून महात्मा फुल्यांना अपेक्षित असणारा जातीय विषमताविरहित राष्ट्रवाद स्वातंत्र्यासाठीची चळवळ बाल्यावस्थेत असताना ते व्यक्त करतात. संस्थानिक असताना राष्ट्र पुनर्निर्माणाचा विचार करणारा हा राजा खऱ्या अर्थाने भारताचा 'राष्ट्रीय नायक' आहे. कारण ज्या काळात स्वातंत्र्यानंतर आपण कोणती राजकीय व्यवस्था स्वीकारायची याचा विचारसुध्दा कोणी केला नव्हता त्यावेळी सामाजिकदृष्टया न्यायपूर्ण वर्तणुकीची मागणी ते या निबंधात करतात. (भांड बाबा, (२०१९): १७)

अस्पृश्यतेच्या सिध्दांतातील फोलपणा सांगताना सयाजीरावांनी अस्पृश्य जातीतील मध्ययुगीन संतांच्या कामगिरीचा दाखला दिला आहे. अस्पृश्यता पाळणे यामध्ये धर्मपालनापेक्षा श्रेष्ठत्वाचे राजकारण अधिक असल्याचे वास्तव मांडतात. हे वास्तव मांडत असताना कालानुरुप प्रत्येक धर्म

बदलत असतो. हे वास्तव धर्माची परिवर्तनशीलता हाच धर्माचा खरा आत्मा आहे ही भूमिका मांडते. १९ जानेवारी १९२४ रोजी बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभात त्यांनी केलेल्या भाषण म्हणजे आधुनिक शिक्षणातून आधुनिक विचारांचा अंगीकार करण्याचा आग्रह होता. या भाषणात फक्त अस्पृश्यताच नव्हे तर लिंगभेद आणि अस्पृश्यता या दोन्ही बाबी एकाचवेळी नष्ट करण्याची गरज व्यक्त करताना ते म्हणतात, “जगातील इतर चार विद्वान मंडळीत तुमचा नावलौकिक राहावा असे ज्या अर्थी तुम्हाला वाटत आहे त्याअर्थी कोणत्याही सच्छिल व सद्हेतू प्रेरित हिंदू माणसाला येथे येऊन आपल्या प्राचीन आचारविधींचे व धर्मग्रंथाचे अध्ययन करण्यास तुम्ही कसलीही आडकाठी ठेवू नये; हिंदू धर्मविद्या प्राप्त करुन घेण्याच्या कामी लिंगभेद किंवा जातिभेद यांची हरकत मानू नये.” (सयाजीराव, भाषणसंग्रह भाग २, (२०१७): ७१)

सर्व जातीतील लोकांच्या मनोवृत्तीमध्ये बदल झाल्याशिवाय अस्पृश्यांची स्थिती सुधारणे अशक्य आहे. त्यामुळे समाजाने संपूर्ण समानता प्रस्थापित करणे अवघड असले तरी अस्पृश्यांना किमान चांगली वागणूक द्यावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. अस्पृश्यांना चांगली वागणूक देण्याचे केवळ आवाहन न करता सयाजीरावांनी बडोद्यातील अस्पृश्योद्धाराचे कार्य नेटाने चालू ठेवण्यासाठी पंजाबमधून आत्माराम नावाच्या शिक्षक व्यक्तीला खास बोलावून घेतले. त्यांच्या कार्याचे कौतुक करताना २१ जानेवारी १९२७ रोजी बडोद्यातील कारेली बागेत केलेल्या भाषणात सयाजीराव म्हणतात, “अखेर शोध करता पंजाबमधील एक विद्वान व कळकळीचा हिंदू माणूस मला मिळाला व त्याच्यावर हे अत्यंजोध्दाराचे काम मी सोपविले. तो माणूस म्हणजे आत्माराम मास्तर. त्यांनी अतिशय उत्साहाने जे चांगले काम केले त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.” (सयाजीराव, भाषणसंग्रह भाग २, (२०१७): ९८) केवळ एकाच व्यक्तीवर या कार्याचा भार टाकण्याऐवजी त्याच्या बरोबरीने आवश्यक ते सक्षम मनुष्यबळ तयार करण्याची दृष्टी त्यांच्यापाशी होती. याच भाषणात ते पुढे म्हणतात, “या अत्यंजोध्दाराच्या कामातही हाच हेतू आहे. तुमच्या हितासाठी मी जे प्रयत्न करतो त्यांचे चीज व्हावे व हे कार्य अक्षयी चालण्यासाठी मी असा विचार केला आहे की, राज्यकारभाराला लायक असे एक—दोन अत्यंज विद्यार्थी उच्च अभ्यासासाठी विलायतेला पाठवावे. मात्र, त्यांनी परत आल्यावर या अंत्यजोध्दाराच्या कामी सध्या जे फुटकळ प्रयत्न चालले आहेत ते संकलित करण्याची जबाबदारी पत्करली पाहिजे. अशी जबाबदारी घेण्यास तयार असतील त्यांना मी विलायतेला अवश्य धाडीन.” (सयाजीराव, भाषणसंग्रह भाग २, (२०१७): ९८) वरील भाषणातील कृतिशीलता आणि निबंधातील आव्हान यांच्यातील सुसंगती विचारात घेता अस्पृश्यता उध्दाराच्या चळवळीचे सूत्रधार म्हणून विचार आणि कृतीच्या पातळीवर सयाजीरावांचे नेतृत्व विचारात घेऊन सदर निबंधाचे पुर्नवाचन केले तरच या निबंधाचे ऐतिहासिक महत्व लक्षात येईल.

पारिया पासून ते ब्राह्मणांपर्यंत अनेक जातींमध्ये उच्च—नीचता मानण्याची जी प्रथा आहे ती पूर्णत: अन्यायकारक आहे. या प्रथेनुसार मानवी जाती ज्या ईश्वरीय नियमाविरुध्द माणसाच्या वैयक्तिक गुण—कर्माऐवजी जन्माधिष्ठित उच्च—कनिष्ठतेवर आधारलेल्या आहे ती जातिप्रथा कोणती जात श्रेष्ठ आहे या निरंतर झगडयात अडकली आहे. त्यातून परस्परांबद्दल द्वेष उत्पन्न झाला आहे. तसेच त्याने ईर्षा आणि अविश्वासाचे बीजारोपण केले आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर येथे ऐक्य नाही, जे आपल्याला राष्ट्र म्हणून ओळखण्यासाठी अत्यावश्यक आहे. म्हणूनच आपल्याला या कृत्रिक बाबी सोडून द्यायला पाहिजेत. कारण या बाबी आपल्याला एकतेच्या झेंडयाखाली आणण्यामध्ये विघ्नकर्त्या ठरु शकतात. यासाठीचा पहिला उपाय म्हणजे आपल्याला अस्पृश्य जातींच्या अडचणी दूर कराव्या लागतील आणि जातीय ऐक्य प्रस्थापित करावे लागेल. (भांड बाबा, (२०१९):४७,४८)

सयाजीराव महाराजांनी जातिव्यवस्था मोडण्यासाठी आपल्या सत्तेचा उपयोग केला. समाजातील सर्व जातींच्या लोकांना त्यांच्या गुणवत्तेप्रमाणे पदे देण्याचा शिवाजी महाराजांचा आदर्श सयाजी महाराजांनी स्वीकारला होता. सयाजीराव महाराजांना केवळ दंडसत्तेच्या आधारे अस्पृश्यता निवारणाचे कार्य करावयाचे नव्हते. एका बाजूने लोकमत अनुकूल करुन दुसऱ्या बाजूने अस्पृश्यता निवारणचे कार्य त्यांनी केले. जातिभेद व अस्पृश्यता मानवनिर्मित आहे. समतेच्या व न्यायाच्या तत्त्वावर समाजाची उभारणी करण्यासाठी अस्पृश्यता नष्ट करणे आपली प्राथमिक जबाबदारी आहे असे महाराजांचे मत होते. देशाच्या प्रगतीसाठी सामाजिक भेद बाधक आहेत. अस्पृश्य मुलामुलींच्या शिक्षणासाठी प्रतिगामी हिंदूंची मदत मिळत नव्हती. तेव्हा त्यांनी मुसलमान, ख्रिश्चन शिक्षकांची मदत घेतली. स्वत:च्या वैयक्तिक जीवनात त्यांनी अस्पृश्यतेचे पालन केले नाही. महाराजांचे विचार उदारमतवादी होते. त्यांनी मागासलेल्या जातींच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या दिल्या, वसतिगृहे सुरू

केली, वहया—पुस्तके व पोशाखाची व्यवस्था केली आणि त्यांच्यासाठी सोयीनुसार शाळा सुरू केल्या. देवाच्या मंदिराप्रमाणे त्यांनी अस्पृश्यांसाठी विद्यामंदिरातील प्रवेश सुकर केला.

श्री. सयाजीराव महाराजांनी आतापर्यंत बजावलेल्या सर्वांगीण लोकोध्दाराच्या दिव्य आणि देशाभिमानी कामगिरीचे महत्त्व केव्हाही व कोणालाही कमी लेखता येणार नाही. सक्तीचे प्राथमिक शिक्षण, ग्रंथालयांची स्थापना, देशी भाषांना उत्तेजन, अंत्यजोध्दाराला मदत, बालविवाहप्रतिबंध, पुरोहितवर्ग सुधारणा, धारासभा, औद्योगिक शिक्षण, उद्योगधंद्यांना उत्तेजन, बंदरांची वाढ, लायक अधिकाऱ्यांच्या सर्ववर्गीय नेमणुका, स्वतंत्र न्यायदानपध्दती, वाङ्मयसुधारणेला साहाय्य, घटस्फोटासारखे समाजसुधारणेचे कायदे, वगैरे अभिनव प्रकारच्या विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व औद्योगिक सुधारणांच्या बाबतीत पहिला यशस्वी उपक्रम करण्याचे अपूर्व व अद्वितीय श्रेय श्री. सर सयाजीराव यांनीच संपादन केलेले आहे. हिंदी राष्ट्रीय सभा, औद्योगिक परिषद, सामाजिक परिषद, साहित्य संमेलन, वगैरेंना त्यांच्या उदाहरणापासून स्फूर्ती व मार्गदर्शकत्व उपलब्ध झालेले आहे. अशा लोकहितात्मक सुधारणाबद्दल श्री. महाराजसाहेब अनेकदा काही ब्रिटिश लोकांच्या व अँग्लो इंडियन पत्रकारांच्या कडक व अनुदार टीकेलाही पात्र झालेले होते. पण त्यामुळे श्री. सयाजीराव हे कधीही कर्तव्यच्युत झाले नाहीत, ही गोष्ट त्यांच्या राजकीय धैर्याची, आत्मविश्वासाची, बाणेदारपणाची, उच्च देशभक्तीची नि:संशय द्योतक आहे. (भांड बाबा, खंड १२, (२०१७):३५८)

**सारांश**

महाराज सयाजीराव गायकवाड यांची थोरवी सांगताना विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात "मी महाराजांकडून उपकृत झालेला मनुष्य आहे. आजकाल भरत खंडात अस्पृश्यता निवारणार्थ चळवळ देशभर फोफावली आहे, तीची पाळंमुळं आणि धुरा महाराजांच्याच खांद्यावर आहे. अस्पृश्य उध्दाराची हिंदुस्थानातील मुहूर्तमेढ ह्या खंबीर पुरुषाने धडक्यासरशी जी रोवली तिचा पुढे विस्तार होत गेला." तर महात्मा गांधी म्हणतात "महाराज सयाजीराव गायकवाडांनी बडोदा संस्थानात हरिजनांसाठी शिक्षणाची दारे उघडली आणि अस्पृश्यतेचा कलंक भारतात प्रथमच कायद्याने पुसून अंमलबजावणी केली. या लोकोत्तर कामासाठीच ते सर्वांहून अधिक अभिनंदनास पात्र आहेत." तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "श्री. सयाजीराव महाराजांचे निधन ही माझी वैयक्तिक फार मोठी हानी झाली आहे. त्यांचे उपकार मी केव्हाही विसरणार नाही. मला त्यांनी जे शिक्षण दिले त्यामुळे आजची योग्यता मला प्राप्त झाली. अस्पृश्य जातीवर त्यांचे फार मोठे उपकार झाले आहेत. त्यांच्याइतके अस्पृश्य जातीसाठी दुसऱ्या कोणीही कार्य केले नाही. ते मोठे समाजसुधारक होते व बडोदे संस्थानात सामाजिक सुधारणांविषयी जे कायदे करण्यात आले ते युरोप व अमेरिकेतील कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राच्या तदविषयक कायद्यापेक्षा पुढारलेले आहेत. त्यांनी सर्व सामाजिक घाणेरडया चालींचा अभ्यास करुन त्यातील दोष काढून टाकण्यात पुढाकार घेतला. स्वत:च्या प्रजेच्या कल्याणासाठी इतके सतत प्रयत्न दुसऱ्या कोणत्याही संस्थानिकांनी केले नाही."

**संदर्भसूची**

१. आपटे दाजी नागेश, (१९३६), 'श्री महाराजा सयाजीराव गायकवाड', (तिसरे) यांचे चरित्र खंड १,२,३, प्रकाशक लेखक खुद्द बडोडे.
२. भांड बाबा, (२०१७), 'महाराजा सयाजीराव गायकवाड गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२', चरित्र साधने प्रकाशन समिती, औरंगाबाद.
३. भांड बाबा,(२०१९), 'आधुनिक भारताचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड', साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
४. नेने दा. वि. (दादूमिया), (२०१०), 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड', श्री गंधर्ववेद प्रकाशन पूणे.
५. गायकवाड फत्तेसिंहराव, (१९८९),'सयाजीराव ऑफ बरोडा', पॉप्युलर प्रकाशन, बॉम्बे.
६. घाटे विठ्ठल दत्तात्रय, (१९६१), 'असे दिवस होत', मौज प्रकाशन, मुंबई.
७. खैरमोडे चांगदेव, (१९५२), 'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर', सुगावा प्रकाशन पुणे
८. पवार निंबाजीराव, (१९८८), 'जेव्हा गुराखी राजा होतो', सयाजी प्रकाशन, मं. गांधी रोड, नाशिक
९. भांड बाबा, (२०१७), 'सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड २,' साकेत प्रकाशन, स्टेशन रोड, औरंगाबाद.